# विभाग ४(१)(बी)(v)

## विकास नियोजन खात्याकडे असलेल्या अथवा

## विकास नियोजन खात्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या

## कागदपत्रांचे वर्गवारीचे विवरण पत्र

| अ. क्र. | कागदपत्राची वर्गवारी | कागदपत्राचे नाव व परिचय | कागदपत्र मिळविण्याची कार्यपध्दत | कोणाच्या नियंत्रणाखाली |
|---|---|---|---|---|
| १ | विकास नियोजन अभिप्राय | विकास नियोजन अभिप्राय हे मंजूर पुनर्रचित विकास आराखडयातील नगर भूमापन क्रमांक / मालमत्ता दर्शविणारा सत्य उतारा असतो. ज्यामध्ये त्या क्षेत्रातील जमिनीचा पट्टा, आरक्षण/नामनिर्देशन/वितरण यासंबंधीच्या माहिती विशेष प्राधिकरणाच्या नियंत्रणाखालील क्षेत्र वगळून दर्शविलेल्या असतात. | विकास आराखड्याच्या प्रत्येक विभागाचे नकाशे हे बृहन्मुंबई महानगरपालिका संकेतस्थळा वर पीडीएफ तक्त्यामध्ये पाहण्याकरिता दर्शविण्यात आलेले आहेत. तसेच विकास आराखडा अभिप्राय mcgm.gov.in या संकेतस्थळावरही उपलब्ध आहेत. | ऑनलाईन |
| २ | नगररचना अभिप्राय | नगररचना अभिप्राय म्हणजे, अंतिम भूभागाच्या /मालमत्तेच्या, मंजूर नगररचना योजनेचा सत्य उतारा असतो ज्यामध्ये त्या क्षेत्राचे स्थान, क्षेत्रफळ, वापर, मालकीहक्क, आरक्षण, नामनिर्देशन, वितरण, देय शुल्क मूळ भूखंड इ. तपशील दर्शविला जातो. | नगर रचना अभिप्राय देखील mcgm.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. | ऑनलाईन |
| ३ | विकास नियोजन शीट्स (डीपी शीटस) | विकास नियोजन शीटवर मुंबईचा नियोजन प्राधिकरणाच्या अधिकारतेखालील भाग दर्शविला जातो ज्यामध्ये शासनाने सन २०१८ मध्ये मंजूर केलेल्या पुनर्रचित विकास आराखडयात विविध सार्वजनिक उद्दिष्टांकरिता आरक्षित/नामनिर्देशित वितरित जमीन दर्शविली जाते. | बृहन्मुंबई महानगरपालिका च्या mcgm.gov.in संकेतस्थळावर पीडीएफ तक्त्यामध्ये प्रत्येक विभागाच्या विकास आराखड्याच्या शिटस पहाण्याकरिता दर्शविण्यात आलेल्या आहेत. | ऑनलाईन |

# पाठ निर्देशांक

पाठ-१ प्रास्ताविक

पाठ-२ वि.नि.अभिप्राय

पाठ-३ नगररचना अभिप्राय

पाठ-४ वि.नि. शीटस

# पाठ-१

## - प्रास्ताविक -

विकास आराखडा म्हणजे विशेष नियोजन प्राधिकरणाखालील क्षेत्र वगळून नियोजन प्राधिकरणाच्या (म्हणजे बृहन्मुंबई महानगरपालिका) अधिकारातील क्षेत्राच्या विकासाकरिता अथवा पुनर्विकासाकरिताचा आराखडा, हा आराखडा म्हणजे जमीन वापर नकाशा आहे. जो निवासी, व्यावसायिक, औद्योगिक व ना-विकास पट्टयात विभागला आहे. तसेच त्यामध्ये शाळा, महाविद्यालये, मोकळया जागा, वैद्यकीय सुविधा, मंडई, कल्याण केंद्र, स्मशानभूमी इ. सारख्या विविध सार्वजनिक सुविधांकरिता आरक्षित जागा तसेच सार्वजनिक गृहनिर्माण / उच्च घनवस्ती गृहनिर्माण याकरिता आरक्षित जमिनी दर्शविल्या जातात. विकास आराखडयात विद्यमान व प्रस्तावित रस्त्यांचे जाळे / रेल्वे इ. सारख्या वहातूक व दळणवळणाचा तपशीलही दर्शविला जातो.

बृहन्मुंबईच्या विकास आराखडयात शहरातील, पश्चिम उपनगरातील व पूर्व उपनगरातील २४ विभागांचे क्षेत्र समाविष्ट आहे.

विकास आराखडयाच्या अमंलबजावणीकरिता नियोजन प्राधिकरणाने त्यांच्या अधिकारतेत तेहतीस नगररचना योजना तयार केल्या आहेत.

प्रमुख अभियंता (विकास नियाजन) यांजकडे नागरिकांकरिता उपलब्ध असलेली माहिती, विकास नियोजन अभिप्राय, नगररचना अभिप्राय, विकास नियाजन शीटस् व सागरी किनारपट्टी नियमन क्षेत्र (सीआरझेड) या स्वरुपात उपलब्ध आहे.

उपरोक्त माहिती मिळण्याकरिता नागरिकांना उपलब्ध असलेल्या सुविधांचा तपशील पुढील पाठांत दिला आहे.

# पाठ-२

## विकास नियोजन अभिप्राय

अ) विकास नियोजन अभिप्राय देण्यासाठी भौगोलिक तंत्रज्ञान प्रणाली (जीआयएस) प्रणालीचा वापर करण्यात येतो. अर्जदार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर portal.mcgm.gov.in – महानगरपालिकेविषयी – विभाग – खात्याची मार्गदर्शिका – प्रमुख अभियंता (विकास नियोजन) – ऑनलाईन डि.पी./ टी.पी. रिमार्क या अंतर्गत वि.नि. अभिप्राय १९९१/२०३४ व नगररचना अभिप्राय प्राप्त करुन शकतात.

तसेच प्रमुख अभियंता (विकास नियोजन) यांनी वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या परिपत्रका नुसार शुल्क आकारुन सदयस्थितीतील विकास नियोजन अभिप्राय / जुने विकास नियोजन अभिप्राय माहितीच्या अधिकारात, प्रचलित दराने शुल्क भरणा केल्यानंतर उपलब्ध होऊ शकतात.

### (ब) विकास नियोजन अभिप्रायात दिली जाणारी माहिती

ज्या भूखंडाकरिता अभिप्राय मागविले जातात त्या संदर्भातील वि.नि. अभिप्रायांमध्ये पुढील माहिती दिली जाते. विकास आराखडयातील तरतुदी नकाशावर चिन्हांकित केल्या जातात व विकास आराखडयानुसार पुढील तपशीलांसह अभिप्राय असलेले पत्र त्यासोबत जारी केले जाते.

1. विकास आराखडयानुसार आरक्षणे / नामनिर्देशने
2. भूखंडाला लागून असलेली आरक्षणे / नामनिर्देशने
3. वि.नि. शीटनुसार, विद्यमान अथवा प्रस्तावित रस्ते अथवा पोचमार्ग यामुळे बाधित झाले आहे का ?
4. जमिनीचा पट्टा
5. रस्त्यांची पुनर्आखणी / आरक्षणांचे पुनर्स्थापन (असल्यास)
6. किनारी क्षेत्र नियंत्रण पट्टा (सी.आर. झेड) उंचीच्या मर्यादा, न.भू.क्र. नकाशानुसार पाण्याचा प्रवाह, वाहिन्या, उच्च दाब तारा, रेल्वे अथवा दुतगती मार्गाचे संरक्षण पट्टे यामुळे भूखंड बाधित असले तर तसे अभिप्राय.
7. कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव), कार्यकारी अभियंता (प.ज.वा) कार्यकारी अभियंता (जलकामे) विमानतळ प्राधिकरण, दुतगतीमार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम खाते, रेल्वे, संस्कृती वारसा तरतुदी नगर रचना योजना इत्यादी.
8. वि.नि. अभिप्राय कोणत्याही जागेची पाहणी न करता व बांधकामाच्या स्थितीचा विचार न करता दिले आहेत. हे अभिप्राय कोणत्याही प्रकारे मालकी हक्क दर्शवित नाहीत.

# पाठ-३

## नगर रचना अभिप्राय

**(अ) पुढील ३३ नगररचना योजनांच्या संदर्भात नगररचना योजना अभिप्रायांकरिता ऑनलाईन अर्ज करता येईल.**

### मुंबई शहर

१. मुंबई शहर क्र.१ मांडवी एलफिस्टन क्षेत्र
२. मुंबई शहर क्र.२ माहीम क्षेत्र
३. मुंबई शहर क्र.३ माहिम क्षेत्र
४. मुंबई शहर क्र.४ माहीम क्षेत्र

### पश्चिम उपनगरे

५ वांद्रे क्र.१
६ वांद्रे क्र.२
७ वांदे क्र.३
८ वांदे क्र.४
९ वांदे क्र.५
१० वांद्रे क्र.६
११ वांद्रे क्र.१०
१२ सांताक्रुझ क्र.१
१३ सांताक्रुझ क्र.२
१४ सांताक्रुझ क्र.३
१५ सांताक्रुझ क्र.४
१६ सांताक्रुझ क्र.५
१७ सांताक्रुझ क्र.६
१८ विलेपार्ले क्र.१
१९ विलेपार्ले क्र.२
२० विलेपार्ले क्र.३
२१ विलेपार्ले क्र.४ व ४ अ
२२ विलेपार्ले क्र.५
२३ विलेपार्ले क्र.६
२४ अंधेरी क्र.१
२५ अंधेरी क्र.२
२६ अंधेरी क्र.६
२७ मालाड क्र.१
२८ बोरीवली क्र.१
२९ बोरीवली क्र.२
३० बोरीवली क्र.३

### पूर्व उपनगरे

३१ घाटकोपर क्र.१
३२ घाटकोपर क्र.२
३३ घाटकोपर क्र.२

## (ब) अर्जाची पध्दत

1. कोणतीही व्यक्ती, कंपनी, ट्रस्ट अथवा संघटना विहित नमुन्यात नगररचना अभिप्रायांकरिता ऑनलाईन प्रक्रियेद्वारा अर्ज करु शकते.

**2.** प्रमुख अभियंता (वि.नि.) यांनी वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या परिपत्रकान्वये 'नगर रचना योजनेच्या' अभिप्रायाकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर विहित शुल्क भरुन 'नगर रचना योजना' याबाबतचे अभिप्राय ऑनलाईन प्राप्त करु शकता.

## (क) नगररचना योजनेत दिलेली माहिती

नगररचना अभिप्राय नकाशासह पत्राच्या आणि प्रपत्र बी/१ च्या स्वरुपात जारी केले जातात. याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

### 1. पत्र/अभिप्राय

- मालमत्तेच्या मालकाचे नाव
- अंतिम भूभाग क्र. व त्याचे क्षेत्रफळ
- भूखंडाचे वापर
- भूखंडाशी संबंधित दुसरे कोणतेही इमारत नियम
- भूखंड विद्यमान आणि/अथवा प्रस्तावित रस्त्यामुळे बाधित असल्यास तसा अभिप्राय
- बाधित आरक्षण/आरक्षणे आणि/अथवा नामनिर्देशने
- योजनेस मंजुरी दिल्याचा तपशील
- नगररचना रस्ता रंदीकरणामुळे बाधित झाले असल्यास तसा अभिप्राय
- असल्यास सुधार शुल्क
- एकूण मागणी (एकूण भरपाईच्या रकमेचा तपशील)

### 2. नकाशा

- लाल रंगातील अंतिम भूभाग
- हिरव्या रंगातील मूळ भूभाग
- नगररचना रस्त्याचे रंदीकरण
- रस्त्याची रंदी

### 3. प्रपत्र बी/१ मधील विवरणपत्र

- मालकाचे नांव
- जमिनीचे भाडेपट्टी
- सर्वेक्षण क्रमांक
- मूळ भूखंडाचा तपशील

- अंतिम भूखंडाचा तपशील
- देणगी/भरपाई व एकूण मागणीचा तपशील
- अभिप्राय

## (ड) <u>नगररचना अभिप्राय जारी करणे</u>

नगर रचना अभिप्राय ऑनलाईन अनुज्ञेय शुल्क भरल्यानंतर उपलब्ध केले जातात.

# पाठ-४

## विकास नियोजन शीटस

**(अ) विविध विकास नियोजन शीटमध्ये बृहन्मुंबईचा मंजूर पुनर्रचित विकास आराखडा समाविष्ट आहे. (शहराकरिता श्रेणी १:२५००) पूर्व व पश्चिम उपनगरे (श्रेणी १:४०००)**

**वि.नि. शीटसची एकूण संख्या**

| विभाग | शीटसची संख्या |
|---|---|
| शहर | ३४ |
| पूर्व उपनगरे | ६२ |
| पश्चिम उपनगरे | ७४ |
| **एकूण-** | १७० |

सदर विकास नियोजन शिट्स महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर portal.mcgm.gov.in – महानगरपालिकेविषयी – विभाग – खात्याची मार्गदर्शिका – प्रमुख अभियंता (विकास नियोजन) – कागदपत्रे – SANCTIONED DP2034 - DP Plans - Development Plan 2034(sanctioned part) SM sheets, 8th May2018) येथे उपलब्ध आहेत.